29-04-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 04/28/2025 11:20 PM Page 1




बागा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प ठरला 'पांढरा हत्ती' पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



प्ले ऑफसाठी केकेआरला विजय आवश्यकच पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, २९ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 236 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 29 April 2025 | Pages 4 | ₹ 4

# पाकिस्तान झाला सावध, युद्धाची तयारी सुरु !

## धोका निर्माण झाल्यास आम्ही योग्य पावले उचलू : मंत्री आसिफ

■ नवी दिल्ली, दि. २८ :

**जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात २६ नागरिकांचा बळी गेल्यानंतर, भारतात संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मुहम्मद आसिफ यांनी दावा केला आहे की, भारतीय सैन्य पाकिस्तानवर कधीही आक्रमण करू शकते.**

इस्लामाबादमध्ये रॉयटर्स या वृत्तसंस्थेशी बोलताना पाकिस्तानचे संरक्षण मंत्री आसिफ यांनी सांगितले की, भारताकडून येणाऱ्या तीव्र प्रतिक्रियांमुळे पाकिस्तानने आपल्या लष्करी दलांची संख्या वाढवली आहे. आम्ही आमच्या सैन्याची उपस्थिती वाढवली आहे. लवकरच काही हालचाली होण्याची शक्यता असल्याने, आवश्यक धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

आसिफ यांनी पुढे सांगितले की, पाकिस्तानी लष्कराने सरकारला भारतीय घुसखोरीच्या संभाव्य धोकेबद्दल आधीच सतर्क केले होते. मात्र, त्यांनी यासंदर्भात तपशील देण्याचे टाळले. दरम्यान, भारतीय अधिकाऱ्यांनी हल्ल्याप्रकरणी तीन संशयित अतिरेक्यांची ओळख पाकिस्तानी नागरिक म्हणून केली आहे. प्रत्युत्तरादाखल, पाकिस्तानने कोणताही सहभाग फेटाळून लावला असून, या घटनेची स्वतंत्र आंतरराष्ट्रीय चौकशी करण्याची मागणी केली आहे.

आम्ही उच्चतम सतर्कतेवर आहोत. जर आमच्या सार्वभौमत्वाला कोणताही धोका निर्माण झाला, तर आम्ही योग्य ते पावले उचलू, असा इशारा आसिफ यांनी दिला आहे.

दरम्यान, पाकिस्तान एअर फोर्सने (पीएएफ) सोमवारपासून (२८ एप्रिल) मध्य आणि उत्तर कमांड क्षेत्रांमध्ये दोन महत्त्वपूर्ण लढाऊ सराव मोहिमा सुरू केल्या आहेत. 'फिजा-ए-बद्र' आणि 'ललकर-ए-मोमीन' या ऑपरेशन्स अंतर्गत, मानवयुक्त आणि मानवरहित प्रणाली, लांब पल्ल्याचे हवाई संरक्षण यंत्रणा तसेच इलेक्ट्रॉनिक युद्ध क्षमता तैनात करण्यात येत आहेत.

या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानचे संरक्षण मंत्री आसिफ यांनी रशिया, चीन आणि काही पाश्चात्य देशांकडून निष्पक्ष चौकशीसाठी मदत मागितली आहे. रशियन वृत्तसंस्था आरआयए नोवोस्तीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितले, की , रशिया, चीन किंवा पाश्चात्य राष्ट्रे या प्रकरणाच्या वस्तुनिष्ठ तपासात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. पाकिस्तानच्या सहभागाचा कोणताही ठोस पुरावा नसताना भारताने केलेली विधाने फक्त निराधार आहेत.

याशिवाय, स्काय न्यूजला दिलेल्या मुलाखतीत, आसिफ यांनी पाकिस्तानच्या भूतकाळातील दहशतवादाशी संबंधित भूमिकेबाबत वादग्रस्त स्वीकार केला. पाकिस्तानने अमेरिकेसह पाश्चात्य देशांसाठी तीन दशकांहून अधिक काळ 'हे घाणेरडे काम' केले असल्याची कबुली आसिफ यांनी दिली.

# लाचखोर गुडलरला जामीन की कैद ?

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**मडगाव, दि. २८ :** दक्षिण गोव्याच्या अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने कोकण रेल्वे पोलिस पोलिस निरीक्षक (पीआय) सुनील गुडलर याच्या जामीन अर्जावर झालेल्या युक्तिवादाची सुनावणी सोमवारी पूर्ण केली. न्यायालयाने संबंधित बाजूंना नोटिसा बजावून, पुढील आदेशासाठी २९ एप्रिलपर्यंत राखून ठेवले आहे.

गुडलर याला मंगळवारी बेळगाव येथील एका मांस व्यापाऱ्याकडून २५,००० रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपाखाली दक्षता संचालनालयाच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली होती. त्याच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ च्या कलम ७ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

सरकारी वकील व्ही. जी. कोस्टा यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, तपास अद्याप प्राथमिक टप्प्यात असून, आरोपीने साक्षीदारांवर दबाव टाकण्याची शक्यता असल्याने त्याला जामीन नाकारावा. याविरोधात बचाव पक्षाचे वकील ॲड. गॅलिलिओ टेलेस यांनी सांगितले की, पोलिसांनी न्यायालयात सादर केलेल्या कागदपत्रांवरून गुडलर याने लाच मागितल्याचा किंवा स्वीकारल्याचा कोणताही स्पष्ट पुरावा आढळत नाही.

ते म्हणाले की, प्राथमिक तक्रारीत फक्त पोलिस कॉन्स्टेबल मोहम्मद हुसेन हरियार याच्यावर आरोप करण्यात आला होता आणि सुरुवातीच्या टप्प्यावर पीआय गुडलर घटनास्थळी उपस्थित नव्हता. गुडलरने २१ एप्रिल रोजी स्टेशन डायरीत आपली गस्तीवर निघाल्याची नोंदही केलेली असल्याचे दाखवले गेले आहे.

एसीबीच्या तपासात असेही स्पष्ट झाले आहे की, मांस व्यापाऱ्याने दिलेल्या तक्रारीनुसार हुसेनने लाच मागणी केली होती आणि त्याचे व्हॉइस रेकॉर्डिंगही पुरावा म्हणून सादर केले गेले. छाप्यात गुडलरच्या केबिनमधून २५,००० रुपये जप्त करण्यात आले होते.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कोकण रेल्वे पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी कर्नाटकातील एका मांस व्यापाऱ्याला गोमांस जप्तीच्या प्रकरणात अडचणीत आणत त्याच्याकडून सुरुवातीला २ लाख रुपयांची आणि नंतर मासिक २५,००० रुपयांची मागणी केली होती. व्यापाऱ्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यानंतर सापळा रचण्यात आला आणि हुसेन व गुडलर यांना रंगेहाथ पकडण्यात आले.

दरम्यान, पोलिस निरीक्षक सुनील गुडलर आणि कॉन्स्टेबल मोहम्मद हुसेन यांना २९ एप्रिल रोजी न्यायालयात पुढील रिमांडसाठी हजर करण्यात येणार आहे. न्यायालयाने त्यांच्या जामीन अर्जावर सुनावणी पूर्ण करून, त्यावरील निर्णयही २९ एप्रिल रोजी जाहीर करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

## निवडक

### तहव्वूरच्या कोठडीत १२ दिवसांची वाढ

नवी दिल्ली, दि. २८ :
मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाइंड तहव्वूर राणाच्या एनआयए कोठडीत १२ दिवसांची वाढ करण्यात आली. राणाला आज दिल्लीतील पटियाला हाऊस कोर्टात हजर करण्यात आले होते. या अगोदर न्यायालयाने त्याला १८ दिवसांची एनआयए कोठडी सुनावली होती. ती मुदत संपल्यानंतर कडक सुरक्षेत राणाला विशेष एनआयए न्यायाधीश चंदरजीत सिंह यांच्यासमोर हजर करण्यात आले. पतियाळा न्यायालयात राष्ट्रीय तपास संस्थेचे (एनआयए) प्रतिनिधित्व ज्येष्ठ वकील दयान कृष्णन आणि विशेष सरकारी वकील नरेंद्र मान यांनी केले. दिल्ली कायदेशीर सेवा प्राधिकरणाचे वकील पीयूष सचदेवा यांनी दहशतवादी राणांचे प्रतिनिधित्व केले. यावेळी एनआयएने दहशतवादी राणाच्या चौकशीसाठी आणखी वेळेची गरज असल्याचे न्यायालयाला सांगितले आणि १२ दिवसांची कोठडी देण्याची विनंती केली. त्यावरुन न्यायाधीश चंदरजीत सिंह यांनी पुढील चौकशीसाठी एनआयए कोठडीत वाढ केली.

-----------

### रशियाचा युक्रेनवर पुन्हा हल्ला

रशिया, दि. २८ :
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या युद्ध संपवण्याच्या इच्छेवर शंका व्यक्त केल्यानंतर रशियाने युक्रेनवर पुन्हा हल्ला चढवला. रविवारी रात्री रशियाने केलेल्या ड्रोन हल्ल्यात किमान चार लोक ठार झाले. रशियाने कुर्स्क प्रदेशाच्या उर्वरित भागांवर पुन्हा ताबा मिळवल्याचा दावा केल्याच्या काही तासांनंतर हे हल्ले झाले. युक्रेनच्या सैन्याने गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये अचानक घुसखोरी करून हा प्रदेश ताब्यात घेतला होता. कुर्स्कमधील लढाई अद्याप सुरू असल्याचे सांगून युक्रेनच्या अधिकाऱ्यांनी रशियाला इशारा दिला. दरम्यान, ट्रम्प मागील मोठ्या कालावधीपासून रशिया-युक्रेन युद्धाला पूर्णविराम देण्यासाठी पुढाकार घेत आहेत. मात्र, शांतता करारात होत नसलेल्या प्रगतीचे खापर त्यांनी पुतीन यांच्यावर फोडले.

-------

### 'वक्फ दुरुस्ती'विरोधातील सुनावणी घेण्यास नकार

नवी दिल्ली, दि. २८ :
सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी वक्फ दुरुस्ती कायदा, २०२५ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या नवीन याचिकेवर सुनावणी घेण्यास नकार दिला. या प्रकरणी अगोदरच खूप याचिका दाखल झाल्या आहेत. म्हणून नवीन याचिका विचारात घेऊ शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठाने याचिकाकर्ते सय्यद अली अकबर यांना या प्रकरणीच्या पाच प्रलंबित याचिकांमध्ये हस्तक्षेप अर्ज दाखल करण्याची मुभा दिली. वक्फ दुरुस्ती कायदा विरोधातील याचिकांवर ५ मे रोजी सुनावणी होणार आहे. दरम्यान, १७ एप्रिल रोजी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या खंडपीठाने म्हटले की, या प्रकरणी याचिका दाखल होणे सुरुच आहे. न्यायालय केवळ ५ याचिकांवर सुनावणी करेल. तसेच या प्रकरणाला कोणत्याही याचिकाकर्त्यांच्या नावाने नाही तर वक्फ दुरुस्ती विधेयक' प्रकरण म्हणून ओळखले जाईल. यावेळी न्यायालयाने केंद्राला ७ दिवसांत प्रतिज्ञापत्र सादर करण्या सांगितले होते. त्यानुसार २५ एप्रिल रोजी केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले. कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळण्याची मागणी सरकारने न्यायालयाकडे केली. संसदेने पारित केलेल्या कोणत्याही कायद्याच्या कोणत्याही तरतुदीवर सविस्तर सुनावणीशिवाय आणि अंतिम निर्णयापूर्वी अंतरिम स्थगिती दिली जाऊ शकत नाही, असे सरकारने प्रतिज्ञापत्रात म्हटले.

# ओल्ड गोव्याच्या रक्षणासाठी केंद्र सरकारकडे साकडे

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २८ :** ओल्ड गोव्याच्या जागतिक वारसा स्थळाचे प्रभावी संरक्षण व्हावे यासाठी, 'सिटीझन्स फॉर डेमोक्रसी' या संघटनेच्या बॅनरखाली गोव्यातील जागरूक नागरिकांनी सोमवारी व्यापक हेरिटेज मास्टर प्लॅन तयार करण्याची आणि विद्यमान संरक्षण कायद्यांची कठोर अंमलबजावणी करण्याची जोरदार मागणी केली.

पणजी येथे आयोजित पत्रकार परिषदेत इतिहासकार प्रा. प्रजल साखरदांडे यांनी सांगितले की, या संदर्भात त्यांनी भारत सरकारला शिफारसींसह निवेदन सादर केले आहे. जुन्या गोव्याच्या अमूल्य सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचे संरक्षण करण्यासाठी एकत्रित आणि बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

साखरदांडे यांनी अधोरेखित केले की, मागील दोन दशकांपासून जुन्या गोव्याच्या ऐतिहासिक परिसरात बेकायदेशीर बांधकामे आणि अनियंत्रित विकासामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या प्रकारामुळे जागतिक वारसा स्थळाच्या चारित्र्याला आणि सांस्कृतिक मूल्यांना मोठा धक्का बसला आहे.

त्यांनी सांगितले की, सध्याच्या अहवालांनुसार जागतिक वारसा स्थळांमध्ये ७० हून अधिक बेकायदेशीर बांधकामे आढळली आहेत. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण , गोवा मंडळ आणि गोवा पुरातत्व विभाग यांनी याबाबत आक्षेप घेतला असूनही या उल्लंघनांकडे दुर्लक्ष केले जात आहे, ज्यामुळे वारसा स्थळाची स्थिती अधिकच बिकट होत आहे.

या परिस्थितीला आळा घालण्यासाठी, त्यांनी राज्य सरकारने एएसआयच्या सहकार्याने एक सर्वसमावेशक वारसा संरक्षण धोरण तयार करून अंमलात आणावे, अशी मागणी केली. यात केवळ पोर्तुगीज वारसाच नव्हे तर पूर्व-पोर्तुगीज स्थळांचाही समावेश असावा, शाश्वत पर्यटनाला प्रोत्साहन द्यावे आणि परिसराची सांस्कृतिक अखंडता जपली जावी, असे त्यांनी स्पष्ट केले. ओल्ड गोव्याच्या सांस्कृतिक अखंडतेला धोका निर्माण करणाऱ्या विकास प्रकल्पांवर प्रतिबंध घालण्यासाठी सर्व संरक्षित क्षेत्रे आणि बफर झोन ओळखून एक व्यापक मास्टर प्लॅन तयार केला जावा, अशी शिफारसही यानिमित्ताने त्यांनी केली. बेकायदेशीर बांधकामे आणि अतिक्रमण याविरुद्ध कठोर कारवाई करावी तसेच कदंब पठारावरील प्रस्तावित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प पर्यावरणदृष्ट्या योग्य ठिकाणी स्थलांतरित करावा, जेणेकरून वारसा स्थळाच्या संरक्षणास बाधा येणार नाही, असेही त्यांनी नमूद केले. साखरदांडे यांनी राज्य सरकार, स्थानिक समुदाय, वारसा तज्ज्ञ आणि युनेस्को यांच्यात अधिक ठोस सहकार्य साधण्याची गरजही अधोरेखित केली. जुन्या गोव्याच्या शाश्वत व्यवस्थापनासाठी आणि व्यापक जनजागृतीसाठी हा सहकार्याचा दृष्टिकोन अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# खाजन जमिनीवरील भरावासंदर्भात बंदर विभागाला अखेर नोटीस

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**मडगाव, दि. २८ :** गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीने (जीसीझेडएमए ) बंदर विभागाला गंभीर इशारा दिला आहे की, आंबेली आणि असोळणा येथील खाजन जमिनीवरील भराव त्वरित साफ केला गेला नाही तर संबंधित व्यक्तीवर दंडात्मक कारवाई केली जाईल. जीसीझेडएमएने निरीक्षण नोंदवले की,बंदर विभागाने पूर्वीच्या दिलेल्या निर्देशांचे पालन केले नाही.

हा मुद्दा त्यावेळी समोर आला, जेव्हा स्थानिक रहिवाशांनी सखल जमिनीवरील भरावाबद्दल कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीकडे तक्रार केली. यामध्ये खाजन शेत, पाणवठे आणि अन्य कोस्टल रेग्युलेशन झोन क्षेत्रांचा समावेश होता. या तक्रारीच्या तपासादरम्यान, जीसीझेडएमएच्या अभियंता आणि फील्ड सर्व्हेअरने साइटची पाहणी केली आणि सीआरझेड अधिसूचना २०११ चे गंभीर उल्लंघन झाल्याचे उघडकीस आणले.

तपासणी अहवालानुसार, नो-डेव्हलपमेंट झोनमध्ये मोठ्या प्रमाणात वाळूच्या मातीचा भराव करण्यात आलेला होता, ज्यामुळे त्या भागाच्या नैसर्गिक परिसंस्थेला, वनस्पतीजीव, भातशेती आणि भूगोलाला अडथळा निर्माण झाला होता. या मालमत्तेवर खंदकही खोदले गेले होते, ज्यामुळे लगतच्या पाणवठ्याचे अस्तित्व धोक्यात आले होते.

त्यानंतर, बंदर विभागाला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. जीसीझेडएमएच्या सुनावणीदरम्यान, बंदर विभागाने भराव हटविण्याची आणि खंदक पूर्ववत करण्याची सहमती दर्शविली. त्यांच्या ४२९ व्या बैठकीत, जीसीझेडएमएने संबंधित विभागाला हे कार्य त्वरित पूर्ण करण्याचे आदेश दिले आणि अनुपालन अहवाल एक महिन्याच्या आत सादर करण्याचे निर्देश दिले.

तथापि, यानंतरच्या महिनाभरात, जीसीझेडएमएने हे लक्षात घेतले की बंदर विभागाने आदेशांचे पालन केलेले नाही. अनुपालन अहवालावरून हे स्पष्ट झाले की, निर्देशांचे पालन करण्यात आलेले नाही. त्यामुळे, पुढील सुनावणीपर्यंत पालन करण्याची अंतिम संधी दिली आहे. अन्यथा, दंडात्मक कारवाई सुरू केली जाईल, असे कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीने म्हटले आहे.


बंदर विभागाने पूर्वी प्राधिकरणाला आश्वासन दिले होते की, ३० मे २०२४ पर्यंत सर्व कार्य पूर्ण केले जाईल. मात्र, त्यानंतरच्या कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी च्या बैठकींमध्ये बंदर विभागाचे प्रतिनिधी अनुपस्थित राहिले होते.

यावर्षीच्या सुरुवातीला झालेल्या सुनावणीमध्ये, बंदर विभागाने स्पष्ट केले की भराव काम एक कंत्राटदाराने केले होते आणि त्यांनी ते साहित्य काढून टाकण्याचे काम पुन्हा सुरू केले आहे. मात्र प्रत्यक्षात निर्देशांची अंमलबजावणी झालेली नाही, हे प्राधिकरणाच्या लक्षात आल्यामुळे हा इशारा देण्यात आला आहे

# विद्यमान भाजप सरकार कामगारविरोधी

▶ **'आयटक'चा आरोप : कामगारांच्या समस्यांवर कोणतीही ठोस कारवाई नाहीच**

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**पणजी, दि. २८ :** प्रमोद सावंत यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकार कामगारविरोधी धोरणे राबवत असल्याचा गंभीर आरोप ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (आयटक) ने सोमवारी केला आहे. आयटक गोवाचे सरचिटणीस ख्रिस्तोफर फोन्सेका यांनी एका पत्रकार परिषदेत हे आरोप केले.

फोन्सेका म्हणाले की, भाजप सरकार कामगारांसाठी कार्यरत असल्याचे सांगत असले तरी प्रत्यक्षात ते व्यवस्थापन समर्थक आणि कामगारविरोधी धोरण राबवित आहे. सरकारने औषध कंपन्यांसाठी अत्यावश्यक सेवा देखभाल कायदा (एस्मा) लागू केला असून, दर सहा महिन्यांनी तो वाढवत आहे. दुसरीकडे, औषध कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना अत्याचारांचा सामना करावा लागत आहे. त्यांना निलंबित केले जात आहे किंवा सिक्कीम आणि जम्मू-काश्मीरसारख्या राज्यात स्थानांतरित केले जात आहे. मुख्यमंत्री काश्मीरमध्ये गोव्यातील नागरिकांना परत आणण्याचे सांगत असले तरी, या कंपन्या गोव्यातील

पान २ ▶

